

# खरंखुरं संकट

जे. कृष्णमूर्ती

# खरंखुरं संकट

इतिहास म्हणजे मानवाने ओढवून घेतलेल्या अरिष्टांची चालू बखरच म्हणावी लागेल. ही अरिष्टं, या विपत्ती असतात तरी कशा? - न चुकता पुन्हा पुन्हा घडणाऱ्या; आपल्याला नेहेमीच भयचकित करणाऱ्या, हादरवून टाकणाऱ्या; विशेषज्ञांचे, अभ्यासकांचे अंदाज बहुतांशी मोडीत काढणाऱ्या, बुद्धीच्या आडाख्यांना ठेंगा दाखवणाऱ्या, तर्क-प्रमाणाला न जुमानणाऱ्या... जगाला हतबुद्ध, अगतिक करून सोडणाऱ्या.

दोन अरिष्टांच्या मध्यंतरात आपण 'सामान्य जीवना'चा गाडा कसाबसा ढकलत रहातो. या तथाकथित 'सामान्य' जीवनात आपला वेळ व ऊर्जा असंख्य गोष्टींमधे खर्ची पडते - प्रांजळ चिकित्सा वगळता. साधारणतः मानवी अस्तित्वाचं व विशेषतः आपल्या जगण्याचं उद्देश्य काय, यावर आपण चिंतन करत नाही. 'आपली आजची जीवनरीत उद्याच्या वैश्विक महासंकटांचा पाया तर रचत नाही ना?' असा प्रश्न आपण विचारत नाही. हा प्रश्न मुळी आपल्याला पडतच नाही, आणि चुकूनमाकून पडला तर आपण त्याला सर्वांशाने भिडत नाही.

जे. कृष्णमूर्ती आपल्यापुढे नेमकं हेच आह्वान उभं करतात. आपल्याला ते कितीतरी मूलभूत प्रश्नांची जाणीव करून देतात. असे काही प्रश्न कृष्णमूर्तींनी जवळपास पाच दशकांच्या (१९३४ ते १९८५) दीर्घावधीत केलेल्या लेखन व जाहीर संवादांतून इथे उद्धृत करण्यात आले आहेत.

© 2020, Krishnamurti Foundation India

*Madras,*
*22 October 1947;*
*The Collected Works, Vol. IV.*

वर्तमान वैश्विक संकट केवळ अचाट आहे. भूतकाळात अशातऱ्हेचे उत्पात थोडकेच उद्भवले असावेत. मानवी जीवनात सर्वसामान्यपणे उद्भवणाऱ्या पेचप्रसंगांपैकी हे संकट नव्हे. ते भारतीय, युरोपीय वगैरे नसून जगाच्या कानाकोपऱ्यात हातपाय पसरत आहे. शारीरिक, मनोवैचारिक पातळीवर, नैतिक व आध्यात्मिक, आर्थिक व सामाजिक पातळ्यांवर पडझड होते आहे, सर्वत्र संभ्रमितता आहे. जणू कड्याच्या टोकावर आपण उभे आहोत आणि क्षुल्लक बाबींवरून भांडणतंटे करत आहोत. या वैश्विक संकटाचं गांभीर्य, त्याचं अगाध, प्रक्षोभक रूप, त्याची विस्मयजनक प्रकृती फारच थोड्यांच्या ध्यानात येत आहे. सार्वत्रिक गोंधळलेपण लक्षात घेऊन काहीजण कड्याच्या टोकावरील जीवनबंधांची पुनर्रचना करण्यात गुंतलेत, मात्र ते स्वतःदेखील गोंधळलेले असल्याने एकंदर गोंधळात आणखी भर पडते आहे.

*Madras,
22 October 1947;
The Collected
Works, Vol. IV.*


ही घोर आपत्ती कुठल्याशा आकस्मिक घटनेतून निपजली नाही; आपण सर्वांनी, आपल्यापैकी प्रत्येकानं तिला हातभार लावला आहे - आपल्या ईर्ष्या, लोभ, लालसायुक्त दैनंदिन उद्योगांतून; सत्तेच्या, वर्चस्वासाठीच्या आपल्या अभिलाषेतून; आपल्या स्पर्धात्मक निष्ठुरतेतून; वैषयिक (sensate) व अशाश्वत, अधीर जीवनमूल्यांमधून. दुसरं-तिसरं कोणी नव्हे, आपणच - तुम्ही व मी - या भयंकर दैन्यास, गडबडगुंत्यास जबाबदार आहोत. तुम्ही अविचारी, अनभिज्ञ आहात; आपल्याच आकांक्षा, सुखसंवेदनांच्या मागे बेभानपणे धावत आहात, तात्क्षणिक संतुष्टी देणाऱ्या मूल्यांमधे गुरफटलेले आहात; तुम्हीच हे महाकाय, सर्वव्यापी संकट पैदा केलं आहे. ....यास तुम्हीच जबाबदार आहात, अन्य कोणताही समूह वा व्यक्ती नव्हे, सर्वस्वी तुम्ही.

*New Delhi,*
*14 November 1948;*
*The Collected*
*Works, Vol. V.*

आधुनिक जग म्हणजे नेमकं आहे तरी काय? आधुनिक जगात सामूहिक यंत्रणा अधिकाधिक तंत्रकुशल, कार्यक्षम बनवल्या जात आहेत. तंत्रज्ञानात अफाट प्रगती होते आहे, सामूहिक गरजांची अपपूर्ती होते आहे, उत्पादनाची साधनं मोजक्याच लोकांच्या मुठीत आहेत. विविध राष्ट्रीयत्वं एकमेकांवर शिंगं रोखून आहेत, स्वायत्त राज्यसत्तांमुळे वारंवार युद्धं जुंपत आहेत. अशी या आधुनिक जगाची दशा आहे, नाही का? तांत्रिक प्रगतीच्या सोबतीने तितकीच महत्त्वाची मनोवैचारिक उन्नती मात्र घडत नाहीय, त्यामुळेच असमतोलाची अवस्था आहे. विज्ञानाची कामगिरी थक्क करून टाकते, मात्र त्याचवेळी मानवी व्यथेला अंत नाही, आपली हृदयं, आपली मनं रिती आहेत. ..तर असं हे आधुनिक जग, जे खुद्द तुम्ही आहात. जग तुमच्यापासून पृथक नाही. तुमचं जग - म्हणजेच तुम्ही स्वतः - उच्चकोटीची बुद्धिमत्ता आणि फोल, रिकामं अंतःकरण असं हे जग आहे.

*Madras,
25 December 1982;
Mind Without
Measure.*

संकट 'या इथे' आहे. बाह्य जगात ते नाहीच; अण्विक संहार, सभवती चाललेली भीषण फाटाफूट, क्रूराचार हे खरं संकट नव्हे. संकट आपल्या आत आहे, आपण जे आहोत, जे बनलो आहोत तेच महासंकट आहे.



## मानवी चेतनेत भयंकर उत्पात होतो

जेव्हा मानव जीवनमांङ्गल्याकडे पाठ फिरवतो.

*Bombay,*
*28 January 1968;*
*Meeting Life.*

पृथ्वीतलावर हजारो वर्षं रहात असलेला मानव इतका दुःखीकष्टी का आहे, इतका संघर्षरत का आहे? ...लोकसंख्येचा विस्फोट, नीतिमत्तेचा अभाव - तांत्रिक ज्ञानाचा वरचष्मा असेल, थेट संवादाचा अभाव असेल तर हे घडणारच - पण ही सोपी स्पष्टीकरणं बाजूला ठेवल्यास, या दुःखाचं मूलनिमित्त, मूलकारण काय आहे? सौजन्याची, करुणेची, हत्या न करण्याची, निर्दय न होण्याची परंपरा असलेल्या या देशात नेमकं काय पूर्णपणे चुकलं? ते नेमकं कसं घडलं, कुठून आलं?

*Madras,
26 October 1947;
The Collected
Works, Vol. IV.*

प्राचीन काळी महत्वाकांक्षा व अधिकारितेपासून मुक्त, निर्मोही, हितैषी अशा काही व्यक्ती, काही समूह जगात अस्तित्वात होते. समाजाला नैतिक, अध्यात्मिक अधःपतनापासून दूर ठेवण्यात त्यांचं सहकार्य होत असे. अशा व्यक्तींचा समुदाय जितका मोठा, तितका ते समाजजीवन अधिक निरापद, त्याची राज्यव्यवस्था अधिक सुरक्षित. याच कारणामुळे भारतासारखा एखाददुसरा देश आजवर तगून राहिला आहे. संसाराच्या उत्तापांत गुंतून न पडलेल्या व्यक्तींची संख्या फारच अत्यल्प असल्यामुळे आता तुमच्यावर अभूतपूर्व संकट ओढवलेलं आहे.

*Bombay,*
*28 January 1978.*

रोग-व्याधींमुळे दुःख होतं. पुरता एकाकी पडल्यावर माणूस दुःखी होतो. दारिद्र्याने पिचलेली, अडाणी, अस्वच्छ, हताश माणसं पाहून त्या दारिद्र्याबद्दल दुःख वाटतं. जगभरातील प्रयोगशाळांमध्ये पशुपक्षी मारले जात असताना, नष्ट केले जात असताना, त्यांची कत्तल होताना पाहून अतीव दुःख दाटून येतं.

*25 February 1983; Krishnamurti to Himself.*

निसर्गाशी आपला किती कमी संबंध येतो हे कसं विचित्र वाटतं. पृथ्वीवरील सर्व जिवंत गोष्टींबद्दल आपल्याला आस्था असल्याचं दिसत नाही. आपण जर निसर्गाशी सखोल, कायमचा संबंध जुळवू शकलो तर आपल्या आहारासाठी आपण एखाद्या प्राण्याची हत्या कदापी करणार नाही. एखाद्या माकडाला, कुत्र्याला, गिनीपिगला आपल्या फायद्यासाठी आपण कधीही इजा करणार नाही, त्यांची चिरफाड करणार नाही. आपल्या जखमा, आपली शारीरिक इजा बऱ्या करण्यासाठी आपण दुसरे मार्ग शोधून काढू, पण मानसिक जखमा भरून काढणं ही एक संपूर्णपणे निराळी गोष्ट आहे. तुम्ही जर निसर्गाच्या सान्निध्यात असाल तर हळूहळू त्या जखमा भरून येतात.

*The Whole Movement of Life is Learning: Letters to the Schools,* Ch. 67.

निसर्गाशी आपला किती कमी संबंध येतो हे कसं विचित्र वाटतं. पृथ्वीवरील सर्व जिवंत गोष्टींबद्दल आपल्याला आस्था असल्याचं दिसत नाही. आपण जर निसर्गाशी सखोल, कायमचा संबंध जुळवू शकलो तर आपल्या आहारासाठी आपण एखाद्या प्राण्याची हत्या कदापी करणार नाही. एखाद्या माकडाला, कुत्र्याला, गिनीपिगला आपल्या फायद्यासाठी आपण कधीही इजा करणार नाही, त्यांची चिरफाड करणार नाही. आपल्या जखमा, आपली शारीरिक इजा बऱ्या करण्यासाठी आपण दुसरे मार्ग शोधून काढू, पण मानसिक जखमा भरून काढणं ही एक संपूर्णपणे निराळी गोष्ट आहे. तुम्ही जर निसर्गाच्या सान्निध्यात असाल तर हळूहळू त्या जखमा भरून येतात.

*The Whole Movement of Life is Learning: Letters to the Schools,* Ch. 70.

तुम्ही जेव्हा सभोवताली पाहता, आपल्या मानवी जगात फारसं नाही, पण निसर्गाचं अवलोकन करता, तेव्हा तुम्हाला अतिविलक्षण संतुलन, व्यवस्था आणि एकात्मतेची जाणीव होते. प्रत्येक झाड व फूल ह्यांना त्यांची स्वतःची व्यवस्था असते, स्वत:चं सौंदर्य असतं; प्रत्येक शिखराला, प्रत्येक दरीला त्यांच्या स्वतःच्या लयबद्धतेची, अचलतेची जाणीव असते. माणूस नद्यांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांचं पाणी दूषित करतो, तरीसुद्धा नद्यांना त्यांचा स्वतःचा असा ओढ आणि दूरवर जाण्याची गती असतेच. माणसाव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विचार केला तर सागरात, वातावरणात आणि आकाशाच्या विशाल अवकाशात एक विलक्षण शुद्ध व सुव्यवस्थित अस्तित्वाचा भाव असतो. कोल्हा जरी कोंबडीची पिल्लं खातो, मोठे प्राणी लहान प्राण्यावर जगतात ह्या गोष्टी क्रूर वाटल्या तरी, ही सुद्धा विश्वातील व्यवस्थेची योजनात्मक रचना असते. ह्या बाबतीत अपवाद आहे तो फक्त माणसाचा. जेव्हा माणूस ढवळाढवळ करीत नाही तेव्हा तिथे संतुलन व सुसंगतीचं अतीव सौंदर्य असतं.

# खरंखुरं संकट



*IIT-Bombay,*
*7 February 1984;*
*Why are You being Educated?*

या समस्त अस्तित्वाचा अर्थ काय? कदाचित तुम्हाला याकडे पाहण्याची इच्छा होणार नाही, तुम्हाला हे टाळावंसं वाटेल... आयुष्याची वीस-वीस, तीस-तीस वर्षं तुम्ही ज्ञान वेचता; भौतिकशास्त्र, भाषाशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, मनोविश्लेषण, मनोविकृतिशास्त्र इत्यादींचा अभ्यास करता, माहितीचं भंडार जमवता. या व्यापात तुम्ही वर्षामागून वर्षं खर्ची घालता, आपण कोण आहोत, काय आहोत, आपण असे का जगताहोत हे स्वतःच शोधून काढण्याकरता मात्र तुम्ही एक दिवस, एक तासदेखील देत नाही.

*Bombay,
10 February 1985;
That Benediction
is Where You are.*

आपण आपली आयुष्यं वाया घालवत आहोत का? 'वाया घालवणं' या शब्दाचा आपल्याला अभिप्रेत असलेला अर्थ आहे - विविध मार्गांनी आपल्या ऊर्जेचा अपव्यय करणं, विशेष प्रकारच्या व्यवसायांत ती घालविणं. आपण आपलं संपूर्ण अस्तित्व, आपलं जीवन वाया घालवत आहोत का? तुम्ही जर श्रीमंत असाल तर तुम्ही कदाचित म्हणाल, 'होय, मी  खूप पैसे गोळा केलेला आहे व तसं करण्यात मला खूप सुख मिळालं आहे?' किंवा तुमच्याकडे जर एखादी विशिष्ट प्रतिभा  असेल, तर ती प्रतिभा धर्मशील जीवनासाठी धोकादायक असते. उपजत प्रतिभा ही देणगी असते. एक क्षमता, एका विशिष्ट दिशेने असलेली योग्यता जे विशेष ज्ञान असतं. विशेषज्ञ बनणं ही एक विखंडनाची प्रक्रिया आहे. म्हणून तुम्ही स्वतःलाच विचारलं पाहिजे की, तुम्ही तुमचं जीवन वाया घालवत आहात का? तुम्ही श्रीमंत असाल, तुमच्याकडे सर्व प्रकारच्या क्षमता असतील. तुम्ही एक विशेषज्ञ असाल, एक महान शास्त्रज्ञ किंवा एक व्यापारी असाल, परंतु तुमच्या जीवनाच्या शेवटी हे सर्व व्यर्थ ठरतं का?

*Saanen, 22July, 1973*

तुमची संस्कृती सांगते: 'जगण्याच्या अर्थाबिर्थाची पर्वा कशाला करता? बिनधास्त जगा! घाण सहन करा, नीचपणाशी जुळवून घ्या. वेदना, चिंता, सुखं, शोक, भयं, शुद्ध कंटाळा, एकाकीपण... जगणं म्हटलं की हे सारं आलंच, त्यापलीकडे जाणं अशक्य आहे. मजा करा! जीवनात आनंद लुटण्याला अग्रस्थान द्या.'

आणि तुम्ही सारे तेच करत आहात.

*The Whole Movement of Life is Learning: Letters to Schools, Ch 28.*

जगभर माणसाचं कमीअधिक प्रमाणात अधःपतन चालू आहे. लैंगिक सुख, स्वतःचच खरं ठरवण्याचं सुख, उत्तेजित होण्याचं सुख, स्वतःमध्येच रस घेण्याचं सुख, प्रतिष्ठा आणि सत्तेचं सुख, सतत स्वतःच्या सुखाची पूर्ती करण्याची मागणी - हे सर्व वैयक्तिक किंवा सामूहिक सुख जेव्हा आयुष्यातील महत्त्वाचं लक्ष्य ठरतं तेव्हा तिथे अधःपतन असतं. जेव्हा मानवी संबंध वरवरचे, सुखावर आधारित असतात तेव्हा अधःपतन असतं. जेव्हा जबाबदारीला काहीही अर्थ राहत नाही, जेव्हा इतरांची किंवा पृथ्वीची, सागरातील वस्तुंची पर्वा राहत नाही, तेव्हा पृथ्वी व स्वर्ग ह्यांचा हा अनादर अधःपतनाचा दुसरा प्रकार असतो, जेव्हा उच्च स्थानावर ढोंगीपणा असतो, धंद्यामध्ये अप्रामाणिकता असते, जेव्हा असत्य हे रोजच्या बोलण्याचा भाग असतं, जेव्हा थोड्या लोकांची हुकूमशाही चालते, जेव्हा फक्त 'वस्तू' महत्वाचं स्थान घेतात तेव्हा समग्र जीवनाशी बेईमानी असते. मग ठार मारणं ही जीवनाची एकच भाषा उरते. जेव्हा सुख हे प्रेम समजलं जातं तेव्हा माणसं जीवनाच्या सौंदर्यापासून, पावित्र्यापासून स्वतःला तोडून टाकतात.

जितकं सुख मोठं तितकी 'मी'ची ताकद मोठी. जेव्हा सुखाचा पाठलाग असतो तेव्हा माणसं एकमेकांचं शोषण करत असतात. जेव्हा आपल्या आयुष्यात सुख महत्त्वाचं होतं तेव्हा नातेसंबंध हे व्यवहार होतात. तृप्तीची उत्कट इच्छा ही सुखावर आधारित असते, आणि जेव्हा ते सुख नाकारलं जातं किंवा ते व्यक्त करण्याचं साधन मिळत नाही तेव्हा तिथे राग, उपेक्षा, द्वेष, कडवटपणा असतो. सुखाचा अखंड पाठलाग हा खरोखर वेडेपणा, विवेकशून्यता आहे.

*Bombay,
15 February 1948;
The Collected
Works, Vol. IV.*

माणसाभवती ऐंद्रिय (sensate) सुखांचा विळखा का बरं पडला आहे? ....आजच्या घडीला हा ज्वलंत प्रश्न झाला आहे कारण आधुनिक समाजात ऐंद्रिय संवेदना (senses) हरप्रकारे उद्दीपित केल्या जातात. वृत्तपत्रं, सिनेमा, मासिकं ही श्रृंगारिकतेनं भरून वाहतात. तुमचं लक्ष आकर्षून घेण्यासाठी जाहिरातींमधून स्त्रीची छबी वापरली जाते. बाह्य व आंतरिक उत्तेजनेला खतपाणी घातलं जात आहे, अथकपणे जोपासलं जात आहे. सांप्रत समाज हा मुळातूनच ऐंद्रिय मूल्यांचा परिपाक आहे. वस्तू, सत्ताबळ, सामाजिक स्थान, आपल्या नावाचं वजन, आर्थिक पतप्रतिष्ठा या गोष्टींना कमालीचं महत्त्व प्राप्त झालं आहे. ऐंद्रिय मूल्यांनी आपल्या आयुष्यांत प्रबळ स्थान पटकावलं आहे. ...तुमची आयुष्यं पोकळ आहेत, सुनी आहेत, नुसता परिपाठ आहे तो - पैसे कमावणं, पत्ते खेळणं, चित्रपट पहाणं, पुस्तकं वाचणं.

*Varanasi,*
*22 January 1954;*
*Leaving School,*
*Entering Life.*

धनवान व्यक्ती नाइट-क्लबस्मध्ये, करमणुकीच्या साधनांमध्ये, आलिशान गाड्या, भटकंतीमध्ये गुंगून स्वतःला विसरू पहातात. बुद्धिवंतांनाही स्वतःला विसरुन जायचं असतं - ते आविष्कार करू लागतात, चमत्कारिक विश्वास बाळगू लागतात. मूर्खांनाही स्वतःचा विसर पडलेला हवा असतो - ते इतरांचं अनुसरण करतात, काय करावं ते सांगणाऱ्या गुरूंचे पाय धरतात. महत्त्वाकांक्षी लोकांना सतत काहीतरी करण्यात व्यस्त राहून स्वतःला विसरून जायचं असतं. तर वयाने वाढतो, पिकू लागतो तसतसे आपण सारे स्वतःला विसरून जाऊ इच्छितो.

अस्वस्थ मनाला सदैव वैचित्र्याने नटलेले नवनवे आविष्कार व नवनव्या कृती हव्या असतात; कशात तरी सारखं गुंतून राहणं हवं असतं; अधिकाधिक नवलपूर्ण अशा संवेदनांची तहान त्याला लागलेली असते. तसंच तात्पुरत्या कुतूहलविषयांची त्याला अखंड गरज भासत असते. आणि या सगळ्या गोष्टींची तहान गप्पासप्पा करीत राहण्याने अंशतः तृप्त होत राहते.


पण स्वतःपासून असं सारखं दूर पळत राहण्याने आपण आपलं चित अधिकाधीक अस्वस्थ बनवून टाकीत असतो. वस्तुतः अस्वस्थतेमुळेच बहुतेक लोक इतरांच्या भानगडींबद्दल चर्चा करण्यात विशेष मग्न झालेले आढळून येतात. अनेक मासिकांतून व वृत्तपत्रांतून गप्पासप्पांची अनेक सदरं आढळतात; तसंच खून, मारामाऱ्या, घटस्फोट इत्यादींबद्दलच्या चटकदार बातम्यांचा जो मजकूर असतो, तो बहुतेक लोक उत्सुकतेने वाचण्यात दंग झालेले आढळतात. इतरांच्या भानगडींची चर्चा करण्याची लोकांची आवडच त्यांच्या या अशा प्रकाराच्या वाचनातून दिसून येते.

अशा प्रकारांमुळे आपण अधिकाधिक बहिर्मुख बनत जातो. आत मात्र अगदी पोकळ होऊन बसतो आणि आपण जितके अधिकाधिक बहिर्मुख होत जातो, तितकी कधीकधी चटकदार संवेदनांची व मनाला गुंतवून ठेवणाच्या विविध प्रकारांची आपणांस अधिक गरज भासू लागते.

*Krishnamurti to Himself, 18 March, 1983*

भविष्याकडे आपण फार लक्ष देत असल्याचं दिसत नाही. टेलिव्हिजनवरील सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत, सतत करमणूक व मनोरंजनाचे कार्यक्रम पाहिले जात असतात. याला एक दोन वाहिन्यांचा अपवाद दिसतो, पण त्याही अल्पकाळ आणि तशा फार गंभीर नसतात. मुलांची करमणूक केली जाते. आपली करमणूक होत आहे हीच भावना साऱ्या जाहिराती बळकट करीत असतात. सर्व जगभर असंच घडत आहे. या मुलांचं भवितव्य काय होईल? एक करमणुकीचा खेळ आहे. त्यात खेळाच्या मैदानावरील काही थोडे लोक प्रत्यक्षात खेळतात तर तीस-चाळीस हजार लोक नुसते बघे  असतात आणि ते घसा कोरडा होईपर्यंत ओरडत असतात. एखाद्या मोठ्या कथिड्रलमध्ये काहीतरी समारंभ, काहीतरी धार्मिक विधी पाहायला आपण जात असतो, ते सुद्धा करमणूकीचंच एक स्वरूप असतं, फरक इतकाच की त्याला तुम्ही पवित्र धार्मिक विधी म्हणता, पण तीसुद्धा एक करमणूकच असते. ते एक भावनिक, अद्भुतरम्य अनुभव व धार्मिकतेचं उद्दीपन असतं. जगाच्या विविध भागांत हे सर्व घडत असताना पाहून, करमणूक, मौजमजा, क्रीडा यामध्ये मन मग्न झालेलं पाहून, आपल्याला जर चिंता, आस्था वाटत असेल तर अपरिहार्यपणे प्रश्न विचारला पाहिजे, भविष्यात काय वाढून ठेवलं आहे? तेच ते पुन्हा विविध स्वरूपांत असणार का? विविध तऱ्हेची करमणूक?...

मनोरंजनाचा उद्योग हळूहळू पसरत आहे आणि ज्यावेळी तो पूर्णपणे ताबा घेईल, जेव्हा तरुण लोक, विद्यार्थी, मुलं यांना मौज, मनात काल्पनिक चित्रं उभी करण्यास, कल्पनारम्य इंद्रियसुखासाठी उद्युक्त केलं जात आहे, तेव्हा संयम आणि तपश्चर्या हे शब्द बाजूस पडतील, ते विचारातही घेतले जाणार नाहीत....तपश्चर्या किंवा तपःपूततेचा अर्थ तुमच्या कानावरही कदाचित पडणार नाही. लहानपणापासून तुम्हाला करमणुकीचे आणि करमणुकीतून स्वतःला विसरण्याचे धडे मिळालेले असतात आणि मानसशास्त्रज्ञ जेव्हा तुम्हाला सांगतात की तुम्हाला जे वाटतं त्याला तुम्ही वाट करून दिली पाहिजे, आणि कुठल्याही प्रकारचा संयम किंवा निरोध हा हानिकारक असतो व त्यातून मेंदूच्या अनेक विकृती निर्माण होतात तेव्हा तुम्ही स्वाभाविकपणे क्रीडा व करमणुकीच्या जगात अधिकाधिक ढकलले जाता. या सर्व गोष्टी तुम्ही जे असता त्यापासून तुम्हाला दूर दूर नेण्यास मदत करत असतात.



# खरंखुरं संकट

*Saanen, 21 July 1981; The Network of Thought.*

रोबो म्हणजेच यंत्रमानवाचा तांत्रिक उत्कर्ष होईल तसतसे माणसाचे श्रम कमी होतील, कदाचित त्याला दिवसांतील दोनच तास काम पडेल. नजीकच्या भविष्यात कदाचित हे चित्र प्रत्यक्षात येईल. तेव्हा मानव काय करेल? ...तो मनोरंजनात दंग होईल, विरंगुळ्याच्या अगणित खिडक्यांमधून डोकावत राहील? की तो अंतर्मुख होईल? - हे मनोरंजन नसतं. याकरता अवलोकनाची, परीक्षणाची, अ-व्यक्तिगत बोधनाची मोठी क्षमता असावी लागते... तर, अशा या दोन शक्यता संभवतात.

*The World Within, Ch:75.*

स्वतःला लाभलेल्या क्षमता वा देणग्यांमधे तुम्ही बंदिस्त झाला आहात. माणसाचे हे मित्र धोकेबाज असतात बरं. ही साधनंच (means) मग साध्य (ends) होऊन जातात, आणि पुष्कळ दुःखाला, विषादाला कारणीभूत ठरतात. तुमचा पोषाख, तुमचा आहार, तुमच्या अंगस्थिती (postures), तुमचा सुखोपभोग तुम्हाला ग्लानी आणत आहे, निस्तेज बनवत आहे; तुमचं मन संवेदनाअक्षम होत चाललं आहे, तुमची आकलनशक्ती क्षीण, बोथट होते आहे... जर तुम्ही पृष्ठीय, उथळ मनाच्या क्रियाकलापाबद्दल जागरूक झालात - जर तुम्ही त्याची वटवट, त्याची नाचानाची पाहिलीत; त्याच्या कारणमीमांसा, निष्कर्षांकडे पाहिलंत, तर त्या सजगतेतून शांतता, सुस्पष्टता येते.

*Poona,
19 September 1948;
The Collected
Works, Vol. V.*

...त्यामुळे आत्म-ज्ञान महत्त्वाचं. स्वतःला समजून घेतल्याविना जगात सुव्यवस्था निर्माण होणं अशक्य आहे. स्वतःमधील विचार, भावना व कृतीच्या समग्र प्रक्रियेचा मागोवा घेतल्याशिवाय जगास शांतता, सुव्यवस्था, सुरक्षितता लाभणं केवळ अशक्य आहे. म्हणून तर स्वतःचा अभ्यास करणं आत्यंतिक महत्त्वाचं आहे, ते पलायन नव्हे. स्वतःचं अध्ययन करणं म्हणजे केवळ निष्क्रियता नव्हे, उलटपक्षी तो करताना आपल्या ठायी विलक्षण सजगता असावी लागते - निवाडा न करणारी, निंदारहित, दोषारोपणमुक्त सजगता. दैनंदिन आयुष्य जगताना 'स्व'च्या संपूर्ण प्रक्रियेचं येणारं भान हे संकुचित नसून त्याची व्याप्ती सतत वाढत जाते, त्यामुळे उत्तरोत्तर स्पष्टता येत जाते, आणि याच सजगतेतून सुव्यवस्था येते. प्रथम आपल्याच अंतःकरणात, व नंतर बाह्यत्करणात, आपल्या नातेसंबंधांमध्ये सुव्यवस्था येते.

*Montevideo,
26 June 1935;
The Collected
Works, Vol. II.*

तुम्ही पीडित नसाल, तुम्ही संघर्षरत नसाल, तुम्हाला कोणतीही समस्या भेडसावत नसेल, जीवनात कोणताही उत्पात घडला नसेल तर सांगण्या-बोलण्यासारखं फार काही नसतं, याचाच अर्थ तुम्ही निद्राधीन असता! - अशावेळी जगण्यानं आधी तुम्हाला खडबडून जागं केलं पाहिजे. पण जेव्हा तुम्ही दुःखाने तडफडू लागता तेव्हा सामान्यतः काय घडतं? तुम्ही ताबडतोब दुःखाचं शमन करू पाहता, त्यावर इलाज शोधू लागता. अशारितीने स्वस्थतेचा शोध घेताघेता तुम्ही आपल्याच करणीने स्वतःला झोपेच्या आधीन करता. ...मनाला जेव्हा धक्का बसतो, खडबडून जाग येते ; ज्याला तुम्ही 'दुःख' समजता, तो खरंतर दुःखाच्या कारणाचा तपास करण्याचा क्षण असतो - आराम पडावा यासाठी न चाचपडता.

*Ojai, 18 June 1934; The Collected Works, Vol. II.*

तुम्ही जर संघर्षाबद्दल अनभिज्ञ असाल, म्हणजेच तुम्ही व तुमचा भवताल यांमध्ये चाललेल्या लढाईची तुम्हाला किंचितही जाणीव नसेल, तर त्यावर उपाय का शोधता? अनभिज्ञ रहा. वातावरणात आवश्यक तो तणाव, संघर्ष निर्माण होऊ देत. तुम्ही त्याचा पिच्छा पुरवू नका. मनात, हृदयात अस्तित्वात नसलेल्या संघर्षाला कृत्रिमरित्या, बनावटरित्या आमंत्रित करू नका. तुम्ही कृत्रिमरित्या संघर्ष उत्पन्न करता कारण 'काही राहून तर जात नाही ना, आपण कशाला मुकत तर नाही ना', याची तुम्हाला काळजी वाटते. आयुष्याच्या हातून तुम्ही राहून जाणार नाही, निसटून जाणार नाही.

*Varanasi,
16 December 1952;
The Collected
Works, Vol. VII.*

घराची खिडक्यादारं बंद करून घेतल्याने, घरात राहिल्याने तुम्हाला सुरक्षित, निर्धास्त वाटतं - कुणाचाही जाच नाही, उपद्रव नाही. पण आयुष्य तसं नसतं. ते सतत तुमच्या दारावर थाप देतं, वारंवार तुमच्या खिडक्यांची कवाडं सताड उघडण्याचा प्रयत्न करतं जेणेकरून तुमची दृष्टी विस्तारू शकेल. तुम्ही घाबरल्याने, भीतीपोटी खिडक्या घट्ट लावून घेतल्याने दारावरची टकटक थांबत नाही, तिचा आवाज वाढत जातो. बाह्य सुरक्षिततांना जितके कवटाळाल तितकं जगणं तुम्हाला हिसके देतं, धक्के देतं.

*Madras,*
*29 December 1979;*
*The Seed of a Million Years.*

आता काय घडलं म्हणजे तुमच्यात बदल घडून येईल? महासंकट? मोठा आघात? अतीव दुःख? न आटणारे अश्रू? यापैकी काहीही घडायचं शिल्लक नाही - आपत्तींमागून आपत्ती आल्या नि गेल्या. तुम्ही रात्रंदिवस अखंड टिपं गाळलीत. काहीही घडलं तरी तुम्ही बदलत नाही कारण अन्य कुणीतरी हे काम करेल या भरवशावर तुम्ही आहात... 'मी शोध घेईन, चिकित्सा करेन' असं कोणीच म्हणत नाही, कोणीच आपणहून पुढाकार घेत नाही.



# खरंखुरं संकट

*Bombay,*
*14 December 1969.*

आयुष्याचं काय केलंत तुम्ही? .... हे आयुष्य तुम्हाला मिळालं; ज्यात सुख, दुःख, भीती, अपराधिता असते, समस्त क्लेश असतात; एकाकीपण, विकलता असते, सौंदर्यही असतं अशी आयुष्य नावाची विलक्षण गोष्ट. ती मिळाली तुम्हाला, आणि तुम्ही काय केलंत तिचं? स्वतःला हा प्रश्न विचाराल तेव्हा रात्री झोपी जाताना उद्‌विग्नपणे तळमळू नका, कारण तुम्ही काहीच केलेलं नाही, तुम्ही चक्क काहीही केलेलं नाही. तुम्हाला जीवन लाभलं, प्राण लाभला - जगातील परम मौल्यवान चीज लाभली; केलंत काय तुम्ही? जगण्याचा चोळामोळा केलात, छळ मांडलात, त्याला विच्छिन्न करून टाकलंत, त्याचे तुकडे पाडलेत; हिंसा, विनाश, विद्‌वेष केलात; प्रेम फुलू दिलं नाहीत; जीवनात करुणेला, उत्कटतेला स्थान दिलं नाहीत. त्यामुळे 'माझ्या आयुष्याचं मी काय केलं' हा प्रश्न स्वतःला विचाराल तेव्हा अपरिहार्यपणे तुम्हाला रडू कोसळेल. पण हे अश्रू भूतकाळासाठीचे असतील, तुम्ही किती काही करू शकला असता या विचाराने दाटलेले. स्वतःचीच कीव येऊन सांडलेले अश्रू.

*Ojai,*
*17 June 1945;*
*The Collected Works, Vol. IV.*

प्रसन्नता, आमोद ही स्वतःतच साध्यं (ends) नव्हेत; धैर्य व आशेप्रमाणेच आनंदाचे प्रसंगदेखील स्वतःतच सफल असलेल्या गोष्टीच्या शोधात असतात. अगदी नेटाने , धीराने आपण अशा साफल्याचा शोध घेतला पाहिजे, ते गवसलं तरच आपल्या विव्हलतेचा, आपल्या वेदनेचा अंत होईल. त्या आविष्कृतीचा प्रवास हा आपणा स्वतःमधून घडतो; अन्य सारे प्रवास हे आपल्याला विचलित करतात, आपल्याला अविद्येकडे, भ्रामकतेकडे नेतात. 'स्व' च्या प्रांताचा हा प्रवास केला जावा तो काही साध्य करण्यासाठी नव्हे; संघर्षाचं, दुःखाचं निराकरण व्हावं म्हणूनदेखील नव्हे; हा प्रवास, हा शोध हीच आराधना असते, प्रेरणा असते.

*Think on These Things,* Ch:26.

आपण सारे मानव एक आहोत. ही पृथ्वी आपली आहे, सर्वांची मिळून आहे आणि प्रेमाने तिची काळजी घेतली तर ती आपल्या सर्वांसाठी अन्न, वस्त्र व निवारा देईल. म्हणून केवळ काही परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरती तुमची तयारी करावी एवढंच शिक्षणाचं कार्य नसून, जीवनाची संपूर्ण समस्या समजण्यास मदत करणं हेही त्याचं  कार्य आहे....ईश्वर म्हणजे काय हे शोधून काढणं ही सुद्धा आपली समस्या आहे, कारण तो तर जीवनाचा पाया आहे. योग्य पाया असल्याशिवाय घर फार काळ उभं राहू शकत नाही आणि आपण जर ईश्वर किंवा सत्य काय आहे त्याचा शोध घेत नसलो तर मानवाने धूर्तपणे लावलेले सर्व शोध अर्थहीन होतील.

*Think on These Things, Ch:17.*

या साऱ्या उद्योगातून नाश व विपत्ती, गोंधळ आणि नैराश्य हीच वाट्यास येतात हे तुम्हांला उघड दिसू शकतं. कमालीच्या दारिद्र्याच्या अगदी शेजारी मोठी चैनीची साधनं आहेत; रोगराईच्या व उपासमारीच्या जवळच फ्रिज व जेट विमानं अस्तित्वात आहेत. हे सारं मानवाचंच कार्य आहे आणि हे सारं पाहून, 'हे एवढंच त्याचं कार्य आहे काय? मानवाचं यापेक्षा अन्य काहीच खरं कार्य नाही की काय?' असा प्रश्न तुम्ही स्वतःला विचारीत नाही का? मानवाचं खरं कार्य काय आहे हे जर तुम्हांला शोधून काढता आलं तर जेट विमानं, कपडे धुण्याची यंत्रं, पूल, वसतिगृहं यांना अगदी वेगळा अर्थ प्राप्त होईल; पण मानवाचं खरं कार्य काय ते कळल्याशिवाय केवळ सुधारणांमध्ये लक्ष घालणं, मानवाने जे आधीच केलेलं आहे त्याचा फक्त आकार बदलणं या गोष्टींनी काहीही साध्य होणार नाही.

मग मानवाचं खरं कार्य कोणतं? मानवाचं खरं कार्य आहे सत्याचा, ईश्वराचा शोध घेणं, प्रेम करणं, स्वतःला कोंडून टाकणाऱ्या स्वार्थी उद्योगात न अडकणं. सत्य काय आहे त्याच्या खुद्द शोधातच प्रेम असतं आणि त्या प्रेमाने, माणसामाणसांत येण्याऱ्या संबंधांत असणाऱ्या प्रेमानेच नवी संस्कृती, नवं जग निर्माण होईल.

*Think on These Things, Ch:11.*

सत्य हे काय आहे, ईश्वर म्हणजे काय हे शोधून काढण्याची ऊर्मी, एवढीच काय ती खरी ऊर्मी आहे आणि इतर साऱ्या ऊर्मी गौण आहेत. संथ पाण्यात तुम्ही जर दगड फेकलात तर गोल गोल वलये पसरत जातात. समाजातील अशीच पसरत जाणारी वलयं म्हणजे गौण हालचाली असतात. त्या सामाजिक प्रतिक्रिया असतात; पण खरा गतिमान प्रवाह मध्यभागी असतो आणि तो असतो सुखाचा, ईश्वराचा, सत्याचा 'शोध ' आणि जोपर्यंत तुम्ही भयग्रस्त असता, जोपर्यंत तुम्हाला धाकाने डांबून ठेवलेलं असतं, तोपर्यंत तुम्हाला तो सापडणंच शक्य नाही. भीती आणि धाक ज्या क्षणी उत्पन्न होतो, त्या क्षणापासून संस्कृतीच्या ऱ्हासाला प्रारंभ होतो.

म्हणूनच तुम्ही लहान असतानाच संस्कारबद्ध न होणं, आई-वडिलांच्या व समाजाच्या धाकाने डांबून ठेवलं न जाणं, हे फार महत्वाचं आहे. म्हणजेच सत्याचा शोध लावण्याची अखंड चेतना तुमच्या ठिकाणी सतत राहील. सत्य म्हणजे काय, ईश्वर म्हणजे काय, याचा शोध जे लोक घेतात, तेच नवा समाज, नवी संस्कृती निर्माण करू शकतात.

*Think on
These Things,
Ch:27.*

खरा धर्मशील मनुष्य सुधारणा करण्याबद्दल सचिंत होत नाही. समाजाच्या व्यवस्थेत फक्त बदल घडवून आणण्याची चिंता तो करीत नाही; उलट, तो सत्य काय आहे ते शोधीत असतो आणि त्या शोधाचाच प्रभाव पडून समाजात परिवर्तन घडत असतं. म्हणूनच विद्यार्थ्याला सत्याचा किंवा ईश्वराचा शोध घेण्यास मदत करणं हा शिक्षणाचा मुख्य हेतू असला पाहिजे. कोणत्याही समाजाच्या चाकोरीत त्याला बसविण्याच्या दृष्टीने त्याची तयारी करुन घेणं एवढाच हेतू त्यात नसावा.

*Saanen,
3 August 1975.*

निरंतर, अम्लान अशा मांङ्गल्याचा, पावित्र्याचा शोध घ्यावा. आणि करुणा असेल तेव्हाच; म्हणजे तुम्हाला दुःखाचा सकळ अर्थ उमजेल तेव्हाच ते अवतरू शकेल - केवळ तुमचंच नव्हे, तर अवघ्या विश्वाचं दुःख. वैश्विक दुःख ही वास्तविकता आहे. ती विचारांची, भावनाविवशतेची रम्य भरारी नाही. आपल्यात व जगातही खरोखर दुःख अस्तित्वात आहे. त्या दुःखासह जगणं, त्यापासून पळ काढण्याचा प्रयत्न न करता पार त्याच्या अंतिम टोकापर्यंत जाणं. जेव्हा तुम्ही पळवाट काढत नाही तेव्हा तुमच्या अंगी त्याला भिडण्याकरता प्रचंड ऊर्जा असते. तेव्हाच तुम्ही त्यापलीकडे जाऊ शकता. ... तुम्हाला दुःखाचा अवघा अर्थ उमगतो, तुमचं दुःख संपुष्टात येतं तेव्हाच करुणा येते. केवळ करुणामय मनच ध्यान करू शकतं, चिरकाल जे पवित्र ते त्यालाच गवसतं.

*Think on These Things, Ch:17.*

खरा धर्म म्हणजे ईश्वराचा शोध, सत्याचा शोध व संपूर्णपणे चांगलं असण्याची भावना होय. त्यात भलेपणा मुद्दाम जोपासून वाढविणं नसतं, नम्रता मुद्दाम धारण करणं नसतं; पण मनाच्या कल्पनांच्या व क्लृप्त्यांच्या अगदी पलीकडे असण्याऱ्या कोणत्या तरी अनामिक तत्वाचा मागोवा असतो. म्हणजेच त्या परतत्वाचा भाव आपल्या ठायी असणं, त्यातच जगणं, स्वतःच ते तत्व होणं असतं. हाच खरा धर्म होय; पण तुम्ही स्वतःसाठी खणलेलं डबकं सोडून जेव्हा बाहेरच्या जीवनसरितेला जाऊन मिळाल तेव्हाच ते करता येईल. मग जीवन फारच आश्चर्यकारक रीतीने तुमची काळजी घेतं; कारण तुम्ही स्वतः काळजी करीनासे होता. मग जीवनच तुम्हाला त्याच्या इच्छेनुसार कोठेही घेऊन जातं, कारण तुम्ही जीवनाचाच भाग झालेले असता. मग सुरक्षितपणाची समस्याच उरत नाही, लोक काय म्हणतात किंवा काय म्हणत नाहीत याची चिंताच नसते आणि जीवनाचं हेच तर सौंदर्य आहे.


*The World Within,*
*Ch.76.*

सत्याचा, वास्तवाचा शोध घेताना रोजीरोटीची व्यवस्था होईल; मात्र केवळ रोजीरोटीच्याच पाठी लागलो तर तीदेखील नष्ट होईल. उदरभरण हे सर्वोच्च मूल्य नव्हे. आपण त्याला सर्वोच्च मानू लागतो तेव्हा हाहाक्कार माजतो; खूनखराबा, उपासमार घडते.

अशाश्वताद्वारे शाश्वताचा शोध घ्यावा. तिथवर जाण्याचा रस्ता नाही, मार्ग नाही, कारण ते सदैव उपस्थित असतंच.

*The World Within, Ch:19.*

केवळ एक परमेष्ठ, अद्‌वितीय वास्तव आहे, केवळ एक मानवता आहे आणि एकच सदाचार आहे. त्याच्या प्रकटीकरणाचा खुद्द तुमच्याखेरीज अन्य कोणताही मार्ग नाही, अन्य कोणी ते करू शकत नाही. स्वतःच्या मुक्तीचा शोध घ्या, मग तुम्ही जगाला भ्रांती व संघर्षमुक्त, क्लेशमुक्त, वैरमुक्त करू शकाल.



खरंखुरं
संकट

*Rishi Valley,*
*16 December 1984.*

तुम्ही प्रश्न विचारलात: माङ्गल्य म्हणजे काय? ते सापडल्याखेरीज, ते उद्भवल्याखेरीज - नाही, तुम्हाला ते सापडणं नव्हे - ते अस्तित्वात आल्याखेरीज नवी संस्कृती, नवी मानव्यता अस्तित्वात येणं अशक्य आहे.

*Madras,*
*22 October 1947;*
*The Collected Works, Vol. IV.*

तुम्ही स्वयंप्रकाशी व्हायला हवं... हाताने वा मनाने साकारलेल्या गोष्टींत फारसा हाशील नाही. आपण पळवाट काढत नाहीओत, कड्याच्या टोकावर असताना केलेल्या कोणत्याही कृतीने पाय घसरणार, कडेलोटच होणार याकडे आपण निर्देश करत आहोत. कड्यापासून दूर गेलो तरच आनंद, सुरक्षा लाभेल. ज्या थोड्याबहुत लोकांच्या हे ध्यानात आलं असेल त्यांनी या खाईपासून दूर, दूरवर प्रबुद्धतेची बेटं निर्माण करावीत. होय, वर्तमान संकटातून, सर्व मानवी समस्यांतून बाहेर पडण्याला मार्ग आहे - ही पळवाट नव्हे, ही वाट जाते अमृत-आनंदाकडे.




Krishnamurti Foundation India
Vasanta Vihar, 124, Greenways Road, Chennai - 600028
Tel: 91-44-24937803 / 24937596 I info@kfionline.org I www.kfionline.org